## बलात्कार आमंत्रित असतो ?

### भाग ३

स्त्रिया बलात्कार हा स्वतःच स्वतःवर ओढवून घेत असतात. म्हणजे बलात्कारासाठी बलात्कार करणारा नव्हे तर जिच्यावर बलात्कार होतो ती स्त्रीच जबाबदार असते असा समज आहे. कोणी बोलून दाखविले नाही तरी बलात्कार, विनयभंग यासारख्या घटनांना प्रथम प्रतिसाद देताना समाजातील बहुसंख्य स्त्री पुरुष हे मनातून पिडीत स्त्री कशी आहे किंवा होती याचा विचार आधी करतात. ती स्त्री हीच गुन्हेगार असल्याप्रमाणे तिच्या वर्तनात चारीत्र्यहिनतेचा शोध घेतात, तिचे दोष शोधतात, हि वस्तुस्थिती आहे.

बलात्कार करणारा बिचारा काय करणार? तो स्त्रीला भुलतो. त्याच्या नितीमत्तेविषयी, त्याच्या स्वतःच्या स्वतःवरील नियंत्रणाविषयी, त्याच्या संस्कारांविषयी कोणीही काहीही बोलताना, निर्भत्सना, टीका करताना दिसत नाही. पुरुष हे असे स्खलनशील असतात आणि ते तसेच वागणार. स्त्रियांनो, तुम्ही नीट वागा. तुम्ही त्यांना चळू देऊ नका किंवा चाळवू नका. बलात्कार, विनयभंग यापासून तुम्ही स्वतःला जपा. बलात्कार, विनयभंग अशा घटनांमुळे खूपच असुरक्षित वाटत असेल तर मुलीला गर्भातच मारून टाका. पण 'पुरूषी वृत्ती' बदललेली नाही आणि बदलणार नाही. या वर्तनाला सुप्त आणि गुप्त रीतीने समाजाचा पाठींबा असतो. हे विचार मन विषण्ण करून जातात.

बलात्कार पिडीत स्त्रीवर, तिच्या कुटुंबीयांवर आरोप केले जातात. त्यांना वाळीत टाकतात. जीव नकोसा वाटावा अशी वाताहत होते. त्या तुलनेत बलात्कारी पुरुषाचे कितपत नुकसान होते? बलात्कार

करणाऱ्या पुरुषांच्या कुटुंबाला वाळीत टाकल्याचे कधी ऐकले आहे? त्यांच्या संस्कारांची चर्चा कधी वृत्तपत्रामध्ये होते?

मृणाल सतीश हे दिल्लीतील नॅशनल लॉ युनिव्हर्सिटीतील प्राध्यापक. त्यांनी सन १९८३ नंतरच्या ८०० बलात्काराच्या केसेसचा अभ्यास केला. त्यांनी ह्या केसेसमधील निकाल वाचून काढले. त्यांचा तुलनात्मक अभ्यास केला. त्यांना ह्या निकालांमध्ये पुरुषसत्ताक विचारांचे स्पष्ट प्रतिबिंब दिसून आले. आरोपींना निर्दोष सोडण्याचे प्रमाण जास्त आढळले. खालच्या कोर्टात जास्त कडक शिक्षा होते पण वरच्या कोर्टात शिक्षेची मुदत कमी केली जाते. कोणताही निकाल देताना कोर्टाला त्याची कारणे द्यावी लागतात. शिक्षा कमी करताना उच्च न्यायालयातील न्यायाधीशांनी दिलेली कारणे देखील पूर्वग्रहदुषित असल्याचे श्री. मृणाल सतीश यांनी नमूद केले आहे. तशी उदाहरणे देखील त्यांनी नमूद करून ठेवली आहेत. खूनाच्या केसेसमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण ४०% होते तर बलात्काराच्या केसेसमध्ये शिक्षा होण्याचे प्रमाण २६% इतके होते. त्यांनी निदर्शनास आणून दिलेली काही उदाहरणे आपण पाहू. सन १९८८ ची केस आहे. श्रीधर बिदनानी विरुध्द ओरिसा राज्य. पिडित मुलीचे वय होते १० वर्षांचे आणि आरोपी होता ४५ वर्षे वयाचा. उच्च न्यायालयाने आरोपीची कैदेची शिक्षा कमी केली. मात्र मोठ्या रकमेचा दंड केला व तो पिडीत मुलीला देण्याचे निर्देश दिले. ती अल्पवयीन मुलगी जेव्हा मोठी होईल तेव्हा तिच्या लग्नासाठी हि रक्कम तिला उपयोगी पडेल असे दंड ठोठाविण्यामागील कारण देण्यात आले.

केरळमधील १७ वर्षे वयाच्या मुलीवर सामुहिक बलात्कार झाला. उच्च न्यायालयाने आरोपींना शासन करण्याऐवजी मुलीला नुकसान भरपाई दिली. पिडीत मुलीची विवाह होण्याची संधी कमी झाली

किंबहुना, विवाहाची शक्यता कमी झाली म्हणून त्याची नुकसान भरपाई आरोपींनी द्यावी असा तो आदेश आहे. सन २००० मध्ये टी. के. गोपालन विरुध्द कर्नाटक राज्य या केसमध्ये निकाल देण्यात आला. खालच्या कोर्टाने जन्मठेपेची शिक्षा दिली. उच्च न्यायालयाने ती कमी करून ९ वर्षे कारावासाची शिक्षा दिली. आरोपी म्हणजे बलात्कार करणाऱ्या पुरुषाला मुली होत्या आणि त्या मुलींच्या भवितव्याच्या दृष्टीने त्यांच्या वडिलांचे म्हणजे ह्या आरोपीचे त्यावेळी तुरुंगात असणे हिताचे नाही असे कारण निकालात देण्यात आले आहे. 'विशाखा' केसमध्ये भवरीदेवी हिच्यासारख्या नीच जातीच्या स्त्री सोबत उच्च जातीचे वयस्क पुरुष असे कृत्य करूच शकणार नाहीत असा निर्वाळा देण्यात आला होता. उच्च न्यायालयाने आरोपींना बलात्कार करण्याच्या आरोपातून निर्दोष मुक्त केले होते. बलात्कार करणे हा अतिशय गंभीर स्वरूपाचा, अघोर म्हणता येईल असा गुन्हा आहे. तो सिद्ध झाला तर त्यास कठोर शिक्षा होणे हा 'न्याय' आहे. मात्र याकडे दुर्लक्ष करून शिक्षेचा विचार केला गेला असल्याचे श्री. मृणाल सतीश यांनी अधोरेखित केले आहे. बलात्काराबाबत आणखी काही गैरसमज आपण पाहू या पुढच्या भागात.

ॲड. प्रज्ञा हेन्द्रे जोशी

अहमदनगर, मो. ९८५००७५४४३